|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

## निवेदन

## २९ वा दीक्षांत समारंभ

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ऑक्टोबर-२०१९ मध्ये व त्यापुर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी Online अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रदान करण्यासाठी **"एकोणतिसावा दीक्षांत समारंभ"** आयोजीत करण्यात येणार आहे.

२९ वा दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे घ्यावयाची आहे, अशा विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे मिळण्यासाठी भरावयाचे Online अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) Home Page वरील Student Conrner→ Examination→Convocation वर खालील मुदतीत उपलब्ध आहेत. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर Online पदवीप्रमाणपत्र अर्ज भरावा. अर्ज भरण्यासाठी अधिकची माहिती विद्यापीठाच्या वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**-:ऑक्टोबर- २०१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्ज करावयाचा विहित कालावधी :-**

| | |
|---|---|
| **विनाविलंब शूल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत** | **दि. ०१ सप्टेबर, २०२० ते १५ ऑक्टोबर, २०२०** |

| | **पदवी/पदविका अर्जासोबत भरावयाचे शूल्क खालीलप्रमाणे** | |
|---|---|---|
| १ | **पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाचे आत)** | **₹ ३५०/-** |
| २ | **पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षापेक्षा जास्तीचा कालावधी)** | **₹ १०००/-** |

पदवीप्रमाणपत्राचे शूल्क Credit Card/Debit Card/Net Banking व्दारे Online Payment करावे. Online अर्ज भरतांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे. अर्जात अपुर्णता/त्रृटी असल्यास अर्ज शूल्कासह रद्द करण्यात येईल.

दीक्षांत समारंभाबाबतची सर्व माहिती यथावकाश वर्तमानपत्रात तसेच विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर जाहीर केली जाईल. तरी मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, त्यांनी सोबतची माहिती सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे.

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/पदवी/७ह/२९८७/२०२० दि. ३१/०८ /२०२०

प्रति माहिती व कार्यवाहीसाठी :

१) मा. प्राचार्य/म. संचालक, सर्व महाविद्यालये/संस्था यांना विनंती की, हे निवेदन सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.
२) कबचौउमवि अंतर्गत सर्व विभाग प्रमुख (प्रशासकीय विभाग व शैक्षणीक प्रशाळा)
३) मा. संपादक दै. यांना जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातून प्रसिध्दीसाठी
४) मा. संपादक दै. यांना मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर प्रसिध्दीसाठी.

# ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या आवश्यक सुचना

१. विद्यार्थ्याने या प्रक्रीयेसाठी स्वत:चा अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईजचा फोटो व प्रचलीत स्वाक्षरी योग्य पध्दतीने Scan करावी. विद्यार्थ्याने १.२५ X १.५ inch या आकाराचा रंगीत फोटो व स्वाक्षरी ९६ ते १५० dpi पर्यंत JPEG Format मध्ये स्कॅनिंग करावा.

२. ज्या पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या अभ्यासक्रमाची अंतिम वर्षाचे गुणपत्रकाची आणि आधार कार्डाची स्कॅनिंग (७५KB पेक्षा कमी) PDF Format मध्ये करावे. गुणपत्रक व आधार कार्ड यांची इमेज वाचनीय (Readable) असल्याची खात्री करूनच Uploade करावे.

३. ऑनलाईन पदवीप्रमाणपत्र अर्ज करण्यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) Home Page वरील Student Conrner → Examination → Convocation यावर ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहे.

## Online अर्ज करण्याकरीता सुचना खालीलप्रमाणे

१. Click to apply online for conferment of degree in 29th Convocation Ceremony या Link वर Click करावे त्यानंतर दिलेल्या Click Here to Apply Online

२. Online पदवी/पदविका अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांने रजिष्ट्रेशन करावे. तद्नंतर मिळालेला User ID व Password टाकून Login करावे.

३. Online अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी आपला परमनंट रजिष्ट्रेशन नंबर (PRN) अचुक टाकावा. त्यानंतर विद्यार्थ्याची शैक्षणिक माहिती उपलब्ध होईल, त्यानंतर पुढील सुचनेप्रमाणे अर्ज भरण्याची प्रक्रीया पूर्ण करावी.

४. जर अचुक PRN टाकल्यानंतर आपले Examination Record उपलब्ध नाही अशी सूचना आल्यास Please Click Here to Continue to Online Application to Regular Degree Certificate या Link वर Click करून अंतिम वर्षाच्या गुणपत्रकाप्रमाणे संपूर्ण शैक्षणीक माहिती अचुकपणे भरावी.

५. आधार कार्डावरील आधार क्रमांक अचुक भरावा.

६. विद्यार्थ्याने Scan केलेला रंगीत पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी Uploade करावी.

७. विद्यार्थ्याने अंतिम वर्षाचे गुणपत्रक व आधार कार्ड Uploade करावे.

**८. विद्यार्थ्याने अर्ज सबमिट करण्यापूर्वी Online अर्जात भरलेल्या माहितीची खात्री करावी. अर्ज सबमिट केल्यावर अर्जात दुरूस्ती करता येणार नाही.**

९. पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्जाचे शूल्क Credit Card/Debit Card/ Net Banking व्दारे Online Payment करावे.

१०. एकदा भरलेले शूल्क परत मिळणार नाही.

११. अर्जात काही त्रृटी अथवा अपूर्णता असल्यास विद्यार्थ्याने अर्जात नमूद केलेल्या E-mail वर केलेली कळविलेली त्रृटीची पूर्तता ७ दिवसांचे आत करावी अन्यथा आपला अर्ज नस्तीबध्द केला जाईल.